# पाचवी परीक्षा प्रश्नपत्रिका २०१५

उमेदवाराचे नाव ________________________________ वय ____________

पत्ता ____________________________________________________________

परीक्षा केंद्र ______________________________________________________

परीक्षा संचालकाचे नाव _____________________________________________

परीक्षा संचालकाची सही _______________________ तारीख ______________

लेखी परीक्षा गुणदान

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | लेखी गुण | एकूण गुण (निम्मे गुण) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | | |
| पैकी गुण | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | ८० | ४० |

तोंडी परीक्षा गुणदान

| | प्रार्थना श्लोक | इतर विषयी माहिती | सामान्य ज्ञान माहिती | कविता गाणी | श्रवण प्रश्नोत्तरे | वाचन प्रश्नोत्तरे | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | |
| पैकी गुण | ५ | ५ | १० | १० | १५ | १५ | ६० |

एकूण गुण

/ १००

प्रश्न क्र.१अ) खालील संख्या शब्दात किंवा अंकात लिहा. ६ गुण

| अंकात लिहा | शब्दात लिहा |
|---|---|
| एक लाख पंचावन्न हजार<br>------------------------------ | २,००,०००<br>-------------------------------------------------- |
| अडुसष्ट हजार नऊशे त्र्याहत्तर<br>------------------------------ | ८८,६३५<br>-------------------------------------------------- |
| पाच लाख तेराशे आठ<br>------------------------------ | १,००,२४९<br>-------------------------------------------------- |
| | |

प्रश्न क्र.१ब ) खालील उतारा वाचून योग पर्याय निवडा. ४ गुण

इबोला साथीचा उगम, आफ्रिकेतील लायबेरिया व सिएरा लिओन या देशात झाला. हा रोग झपाट्याने इतर देशात पसरला व तीन लाख साठ हजार लोक आजारी पडले. या आजाराची लक्षणे अत्यंत भयानक होती.

या रोगामुळे एकूण एक लाख चाळीस हजार लोक मृत्युमुखी पडले. स्वच्छता व सुरक्षा नियम पाळले असते तर आजारी पडणाऱ्यांची संख्या अर्ध्याने कमी असती असे डॉक्टर व इतर अधिकाऱ्यांचे मत पडले.

१)इबोला साथीचा उगम कुठे झाला? ___________

अ) आफ्रिकेबाहेरील देशात ब) लायबेरिया व सिएरा लिओन क) झाएर व गिनी

२)इबोला साथीमुळे एकूण किती लोक मेले? ___________

अ) ३,६०,००० ब) १,४०,००० क) १,४४,६५०

३)या आजारातून किती लोक बरे झाले? ___________

अ) दोन लाख चाळीस हजार ब) एक लाख चाळीस क) दोन लाख वीस हजार

४)स्वच्छता व सुरक्षा नियम पाळले असते तर आजारी पडणाऱ्यांची संख्या किती असती? ___________

अ) तीन लाख ब) पंधरा हजार क) एक लाख ऐंशी हजार

प्रश्न क्र.२ खाली दिलेल्या कोणत्याही **<u>एका</u>** विषयावर वर्तमानपत्रासाठी बातमी लिहा. ( ८-१० वाक्ये) १० गुण

हवामान / खेळ / विज्ञान

प्रश्न क्र.३खालील कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. १० गुण
( १०-१५ वाक्ये)

रवींद्रनाथ टागोर / मी मोठा किंवा मोठी झाल्यावर.../ प्रवासाचे फायदे

प्रश्न क्र.४ अ) खालील कोणत्याही <u>एका</u> विषयावर पत्र लिहा.
( ५-६ वाक्ये) ५ गुण

शाळेच्या परिसरातील कचऱ्याबद्दल शिक्षकांकडे तक्रार /

मैत्रिणीला बक्षीस मिळाल्याबद्दल अभिनंदन /

तुमच्या आवडत्या लेखकाला त्यांचे नवीन पुस्तक आवडल्याचे कळवा.

प्रश्न क्र.४ ब) खालील वाक्ये वाचा व कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य वाक्प्रचाराची निवड करा. ५ गुण

( तहान भूक विसरणे, कामातून जाणे, धडा शिकवणे, पंचाईत होणे, डोळ्याचे पारणे फिटणे)

अ)सोसाट्याच्या पावसाने, आधीच मोडकळीला आलेली छत्री तुटून गेली.

वाक्प्रचार: ______________________________

आ) सकाळच्या गडबडीत चष्मा घरी राहिल्यामुळे परीक्षेचा पेपर कसा लिहावा, असा प्रश्न ताईला पडला.

वाक्प्रचार: ______________________________

इ)एव्हरेस्टच्या शिखरावर पोहोचल्यावर, समोरचे दृश्य पाहून सानिकाला अतिशय आनंद झाला.

वाक्प्रचार: ______________________________

ई)धोब्याने आळशी गाढवाला शिक्षा करायची ठरवली.

वाक्प्रचार: ______________________________

उ)संत तुकाराम विठ्ठलाचे अभंग रचण्यात पूर्णपणे गुंग झाले.

वाक्प्रचार: ______________________________

प्रश्न क्र.५अ) अधोरेखित शब्दांच्या जागी त्या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द वापरा आणि आवश्यक ते बदल करून अर्थपूर्ण वाक्य लिहा. ४ गुण

उदाहरण:

यशला *जास्त* मते मिळाली म्हणून तो शाळा प्रमुख निवडणूक *जिंकला*.

यशला *कमी* मते मिळाली म्हणून तो शाळा प्रमुख निवडणूक *हरला*.

१) मित्राने *टीका* केल्यामुळे मोहनला *रडू* आले.

___________________________________________

२) *आळशीपणाचे* अनेक *तोटे* आहेत.

___________________________________________

प्रश्न क्र.५ब) अधोरेखित शब्दांच्या जागी त्या शब्दाच्या समानार्थी शब्द वापरा आणि आवश्यक ते बदल करून अर्थपूर्ण वाक्य लिहा. ४ गुण

उदाहरण:

मांजराचे पिल्लू हरवल्यामुळे राधा *फार दु:खी* झाली.

मांजराचे पिल्लू हरवल्यामुळे राधा *खूप उदास* झाली.

१)पुष्कळ पीक आल्याने शेतकरी खूष झाला.

___________________________________________

२)आभाळातले सर्व पक्षी मोजणं अवघड होतं.

___________________________________________

प्रश्न क्र.५क) शब्दाचे योग्य रूप वापरून गाळलेल्या जागा भरा. २ गुण

उदाहरण:

फूल- <u>फुलांची</u> आवड असली की <u>फुलं</u> हवीहवीशी वाटतात.

शहर- _________चे सर्वांनाच आकर्षण असते. _________च्या व गावाच्या वातावरणात पुष्कळ फरक असतो. ________ लोकं नेहमी घाईत असतात! _______मध्ये जास्त प्रदूषणही असते.

प्रश्न क्र.६ खालील वाक्ये वाचून बरोबर  किंवा चूक  अशी खूण करा.

१० गुण

१)प्रदूषण पृथ्वीवरील जीवनास हानीकारक आहे._______

२)ज्ञानेश्वरीमध्ये भगवद् गीतेचे सार सांगितले आहे. _______

३)भारताने पाठवलेले मंगळयान ऑस्ट्रेलियाला पोहोचले. _______

४)तुकाराम, रामदास, जनाबाई महाराष्ट्रातील थोर अभिनेते होते. _______

५)कचरा साफ केल्याने रोगराई पसरते. _______

६)वाळवंटात नेहमी हिमवृष्टी होते. _______

७)सायकल चालविताना शिरस्त्राण घालू नये. _______

८)कानठळया बसतील अशा आवाजाने ध्वनी प्रदूषण होते . _______

९)पृथ्वी व इतर खगोलीय वस्तूंमधील अंतर प्रकाशवर्षात मोजतात. _____

१०)समुद्रात झालेल्या भूकंपामुळे त्सुनामी होते. _______

प्रश्न क्र.७ योग्य शब्दाभोवती गोल करा. १० गुण

१)भारतीय संस्कृती __________ आहे.
(इंग्रजी / प्राचीन / श्रीलंकन )

२)मला मैत्रिणीचे नवीन घर बघायची ________ होती.
( भीती / उत्सुकता / वाट )

३) उद्धट मुलगा बाईंना ________ प्रश्न विचारीत होता.
( नम्रपणे / उलटसुलट / गोडीगुलाबीने )

४) मनूचे लक्ष वर्गात नव्हते. तिची नजर ________ फिरत होती.
( आदळापट / एकाग्रतेने / सैरभैर)

५)राजाचे राहण्याचे ठिकाण:________
( झोपडी / राजपुत्र / राजवाडा)

६)सूर्यातून येणारा उजेड:__________
( उष्णता / सूर्यप्रकाश / सूर्यग्रहण)

७) कामाच्या कागदांचा गठ्ठा: ________
( कचरा / कागदपत्र / वाचनालय )

८)हाताने केलेले कलाकुसरीचे काम: ________
( चंद्रकला / हस्तकला / वक्तृत्व)

९)देशभर बोलली जाणारी भाषा: ________
( बोलीभाषा / मातृभाषा / राष्ट्रभाषा )

१०) घरी करण्याचा अभ्यास: ________
( गृहपाठ / वर्गपाठ / सपाट )

प्रश्न क्र.८अ) खालील उताऱ्याचे इंग्रजीतून मराठीत भाषांतर करा. ५ गुण

Long long ago there lived a prince called Gautama in India. He led a happy life in his palace.
One day he saw a an old man, bent and walking with the help of a stick. After sometime he saw people mourning the death of a relative. He was sad to see these events. He decided to search for a solution to these problems.

He became known as Gautam Buddha. He spread his message of love & peace throughout the world.

प्रश्न क्र.८ ब)खालील उताऱ्याचे मराठीतून इंग्रजीत भाषांतर करा. ५ गुण

२०० वर्षांपूर्वी जॉन चॅपमन अमेरिकेत राहत होता. त्याने देशभर फिरून सफरचंदाची हजारो झाडे लावली. निसर्गप्रेमी जॉनने सफरचंदाची झाडे तर लावलीच त्याबरोबर अनेक लोकांशी दोस्ती केली. लोक प्रेमाने त्याला जॉनी ॲपलसीड म्हणू लागले. त्याने लावलेली झाडे आजही दिसतात व फळांनी लगडलेली असतात.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------